**Initial Environmental Examination (Alibaug)**

**सारांशः-**

महाराष्ट्र तृतीयक आरोग्य सेवा व वैद्यकीय शिक्षण क्षेत्र विकास कार्यक्रम (MTCMESDP) चा उद्देश राज्यातील तृतीयक आरोग्य सेवा आणि वैद्यकीय शिक्षणाचा सर्वांगीण विकास करणे हा आहे. या कार्यक्रमांतर्गत दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत.

सदर प्रकल्पांतर्गत अलिबाग, सिंधुदुर्ग, अमरावती व वाशीम या जिल्ह्यांमध्ये नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये उभारली जाणार आहेत.

सदर प्रकल्पाद्वारे गंभीर पर्यावरणीय परिणाम अपेक्षित नसल्याने सदर प्रकल्प आशियाई विकास बँकेच्या पर्यावरणीय निकषांनुसार Category-B मध्ये मोडतो.

सदर प्रकल्पासाठी आवश्यक ना- हरकत प्रमाणपत्रे (पर्यावरण मंजुरी (Environmental Clearance), प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी, अग्निशमन ना-हरकत इत्यादी) घेणे आवश्यक आहे.

अलिबाग येथे प्रस्तावित प्रकल्पामध्ये वैद्यकीय महाविद्यालय, ५०० खाटांचे रुग्णालय, मुला-मुलींसाठी वसतिगृहे, ग्रंथालय, प्रयोगशाळा, रक्तपेढी, ऑपरेशन थिएटर, पार्किंग, कचरा व्यवस्थापन व्यवस्था इत्यादी सुविधा असतील.

जैववैद्यकीय कचरा (Biomedical Waste), सांडपाणी व इतर घातक कचऱ्याचे व्यवस्थापन संबंधित नियमांनुसार केले जाईल.

प्रकल्पामुळे होणारे संभाव्य पर्यावरणीय परिणाम कमी करण्यासाठी पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP) आणि पर्यावरण निरीक्षण योजना (EMoP) तयार करण्यात आली आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषध विभाग (MEDD) हा Executing Agency (अंमलबजावणीसाठी प्रमुख संस्था) असून वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय (DMER) हे Implementing Agency (प्रकल्प राबविणारी संस्था) आहे.

सदर प्रकल्पांतर्गत पर्यावरणीय सुरक्षेसाठी विविध स्तरांवर समित्या व पर्यावरणीय युनिट स्थापन केले जातील.

प्रकल्पाच्या संपूर्ण कालावधीत स्थानिक नागरिक व इतर भागधारकांशी सल्लामसलत केली जाईल.

तक्रारींचे निराकरण करण्यासाठी Grievance Redressal Mechanism (GRM) ही तीन स्तरांची तक्रार निवारण व्यवस्था उभारली जाईल.

सदर प्रकल्प अलिबाग व परिसरातील नागरिकांना आधुनिक, परवडणारी व दर्जेदार आरोग्य सेवा तसेच उच्च दर्जाचे वैद्यकीय शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.